International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# महाराष्ट्र शासनाच्या १९६० ते २०२५ या काळातील मत्स्यव्यवसाय धोरणांचा भौगोलिक आढावा

**डॉ. नामदेव शामराव आडनाईक**

*सहयोगी प्राध्यापक , भूगोल विभाग, चंद्राबाई-शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.*

***Corresponding Author –डॉ. नामदेव शामराव आडनाईक***

**DOI - 10.5281/zenodo.18709496**

**सारांश (Abstract):**

*महाराष्ट्र शासनाच्या १९६० ते २०२५ या काळातील मत्स्य व्यवसाय धोरणांचा भौगोलिक आढावा या शोध निबंधात महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसायाची प्रगती, धोरणे आणि भौगोलिक वैशिष्ट्ये यांचे परीक्षण केले आहे. महाराष्ट्रास ७२० कि.मी. लांबीची किनारपट्टी लाभली असून, ११२,५१२ चौ.कि.मी. उपखंडीय उतार क्षेत्र आणि विविध अंतर्गत जलस्रोत २७३,७५० हेक्टर जलाशय क्षेत्र, यांमुळे मत्स्यव्यवसाय हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण भाग आहे. १९६० च्या दशकात 'महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय कायदा, १९६०' च्या मत्स्य संरक्षण आणि संवर्धनावर भर असलेल्या या धोरणांपासून ते २०२५ पर्यंतच्या 'प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना' (PMMSY) अंतर्गत शाश्वत विकास, तंत्रज्ञानाचे एकीकरण आणि कृषीचा दर्जा देणारी मत्स्यव्यवसाय धोरणे ही राष्ट्रीय धोरणांच्या प्रवाहाशी संबधित होती परंतू त्यात प्रदेशनिहाय भौगोलिक घटकांनुसार बदल दिसून येतात. उत्पादन वाढ, सामाजिक-आर्थिक विकास, पर्यावरणीय स्थिरता आणि भौगोलिक दृष्टीकोणातून संतुलित विकास ही या धोरणांची प्रमुख वैशिस्टये दिसून येतात. या शोधनिबंधात गेल्या सहा दशकांच्या सागरी आणि राज्यातील अंतर्गत मत्स्यव्यवसाय यांचा भौगोलिक दृष्टीकोनातून आढावा घेतला आहे, दुय्यम माहितीवर आधारित या शोध निबंधात धोरणांचे प्रभाव, आव्हाने आणि भविष्यातील दिशा यांचे विश्लेषण केले असून निष्कर्ष आणि उपाययोजना सुचविल्या आहेत.*

**प्रस्तावणा:**

महाराष्ट्र हे भारतातील एक प्रमुख सागरी आणि अंतर्गत मत्स्यव्यवसाय असलेले राज्य आहे. राज्याच्या भौगोलिक रचनेत पश्चिमेकडे कोकण किनारपट्टी, पूर्वेकडे विदर्भातील नद्या आणि जलाशये (गोदावरी, वर्धा खोरे), मध्यभागी कृष्णा व भीमा खोरे आणि उत्तरेकडे खानदेश (तापी नदी खोरे) अशी विविधता आहे. १९६० पासून महाराष्ट्र शासनाने मत्स्यव्यवसायाला आर्थिक आणि सामाजिक विकासाचा भाग मानून सागरीव अंतर्गत धोरणे आखली आहेत. १९६० च्या मत्स्यव्यवसाय कायद्यापासून ते २०२५ च्या नवीन धोरणांपर्यंत उत्पादन वाढ, रोजगार निर्मिती (३.६४ लाख मच्छीमार) आणि शाश्वतता यावर भर दिलेला दिसून येतो. परंतु, भौगोलिक विविधतेमुळे धोरणांचा प्रभाव वेगवेगळा आहे. या शोध निबंधात धोरणांचा भौगोलिक आढाव्यामध्ये उत्पादन, आव्हाने आणि विकास यांचा समावेश आहे. राष्ट्रीय उत्पादनात राज्यातील मत्स्यव्यवसायाचे ५% योगदान आहे, पण अतिमासेमारी (कोकणात ८७,७१७ मच्छीमार कुटुंबे), जलप्रदूषण, अंतर्गत भागात औद्योगिक प्रदूषण आणि हवामान बदल इ. मुख्य समस्या आहेत.

भौगोलिक संधी आणि आव्हाने यांचा विचार करून राज्याने स्वतःची धोरणे आखली आहेत. हा कालावधी हरित क्रांतीच्या प्रभावातून साधनसंपत्तीच्या विकासापासून ते 'नील क्रांती' पर्यंत, आणि आता 'शाश्वत

मत्स्यव्यवसाय' व 'निळी अर्थव्यवस्था' या संकल्पनांकडे वाटचाल करताना दिसून येतो. भौगोलिक आढाव्याचा उद्देश सागरी व अंतर्गत या दोन्ही विभागांतील धोरणात्मक लक्ष्य, गुंतवणूक आणि परिणाम यामधील फरक आणि परस्परसंबध समजून घेणे.

**अभ्यास क्षेत्र:**

महाराष्ट्राची भौगोलिक रचना मत्स्यव्यवसायासाठी अनुकूल आहे. राज्याचे एकूण क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ.कि.मी. असून, पश्चिम किनारपट्टी ७२० कि.मी. लांब आहे, ती पालघर, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सात जिल्ह्यांमध्ये विभागली आहे. कोकण विभागात सागरी मत्स्यव्यवसाय प्रमुख आहे, ज्यात ५२६ मासेमारी गावे, १७३ मासे उतरवण्याची केंद्रे आणि ३,६४,८९९ मच्छीमार लोकसंख्या आहे. सागरी उत्पादन २०२४-२५ मध्ये ४,६३,७५८ मे.टन आहे, ज्यात पापलेट, बांगडा, सुरमई, रावस, बोंबील, मांदेली, सौंदाळे, शेवटे, तारली, कोळंबी इ. प्रमुख आहेत. निमखारे पाणी क्षेत्र ८०,००० हेक्टर असून, ५४ खाड्या आहेत तेथे निमखाऱ्या पाण्यातील मत्स्यपालन विकसित झाले आहे (झिंगे उत्पादन). मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ही प्रमुख मत्स्यबंदरे आहेत. अंतर्गत मत्स्यव्यवसाय विदर्भ (नागपूर, अमरावती विभाग), मराठवाडा (औरंगाबाद (संभाजीनगर), नांदेड: गोदावरी खोरे) आणि पश्चिम महाराष्ट्र (पुणे, सातारा, सांगली,कोल्हापूर: कृष्णा खोरे), खानदेश (तापी खोरे), मध्ये केंद्रित आहे. एकूण जलाशय क्षेत्र २,७३,७५० हेक्टर, ज्यात लहान जलाशय १,१९,५१५ हेक्टर (४४%), मध्यम ४,०३० हेक्टर आणि मोठे १,५२,२०५ हेक्टर. भुजल मत्स्य उत्पादन २,७०,७७७ मे.टन, ज्यात मासे रोहू, कटला, मृगळ, चंदेरा आणि तिलापिया इ. प्रमुख आहेत. जलसंवर्धन आणि शेतीबरोबर एकात्मिक मत्स्यव्यवसाय केला जातो. उत्तर कोकणात (पालघर-ठाणे) निमखारे पाणी शेती (झिंगे उत्पादन), तर दक्षिण कोकण (रत्नागिरी-सिंधुदुर्ग) मध्ये पारंपरिक सागरी मासेमारी तर अंतर्गत भागात जलाशय व नदीकाठी मासेमारी मत्स्यव्यवसाय चालतो. कोकणात सागरी मासेमारीस मान्सून काळात बंदी असते, अंतर्गत भागात मत्स्यबीज संवर्धन केले जाते. कोकणात सागरी उत्पादन ८७% तर अंतर्गत भागात १२%, अशी उत्पादनात भौगोलिक विषमता दिसून येते. हवामान बदलामुळे कोकणात चक्रीवादळांची वारंवारिता वाढली आहे, तर अंतर्गत भागात मराठवाड्यात दुष्काळाचा प्रभाव दिसून येतो.

**गृहितके:**

सदर गृहितके दुय्यम माहितीवर आधारित आहेत.

१. महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसाय धोरणे भौगोलिक विविधतेमुळे वेगवेगळया भागांत प्रभावी ठरली आहेत,
२. राज्यात १९६०-२०२५ या काळात धोरणांनी उत्पादन वाढविले, पण अतिमासेमारीमुळे सागरी भागात जैवविविधता कमी झाली.
३. अंतर्गत भागातील जलाशय- नदीकाठ आधारित मत्स्यव्यवसाय धोरणांनी रोजगारात वाढ, पण जलप्रदूषण आणि दुष्काळ ही आव्हाने आहेत.
४. भविष्यातील धोरणे शाश्वत विकास आणि हवामान बदलावर भर देतील.

**उद्दिष्टये:**

१. महाराष्ट्रातील १९६० ते २०२५ या काळातील मत्स्यव्यवसाय धोरणांचा दशकनिहाय सविस्तर आढावा घेणे.

२. मत्स्यव्यवसायाच्या सागरी आणि अंतर्गत धोरणांचा भौगोलिक प्रभाव, उत्पादन आणि आव्हाने यांचे परीक्षण करणे.

३. मत्स्यव्यवसायाची भविष्यातील दिशा आणि शाश्वत विकासाचे विश्लेषण करून उपाययोजना सुचविणे.

**अभ्यासपद्धती व माहिती संकलन:**

सदर शोध निबंध दुय्यम माहितीवर आधारित असून यामध्ये केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाचे अहवाल, पंचवार्षिक योजनांची दस्तऐवज, विविध धोरणांचे मसुदे, आर्थिक सर्वेक्षणे, प्रकाशित शोध निबंध, पुस्तके, वृत्तपत्रातील लेख इत्यादींचा समावेश आहे. या माहितीचे भौगोलिक प्रादेशिकीकरण करून दशकनिहाय आढावा तयार करण्यासाठी कालक्रमानुसार विश्लेषण केले आहे.

**महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसाय धोरणांचा दशकनिहाय आढावा:**

**१. संस्थात्मक पाया आणि साधनसंपत्ती विकास (१९६०-१९७०):**

राज्य निर्मितीनंतरच्या पहिल्या दशकात, धोरणांचा उद्देश मत्स्यव्यवसायाचा संस्थात्मक पाया घालणे आणि जलस्रोत साधनसंपत्तीचा विकास करणे असा होता. सागरी प्रदेशात, प्रामुख्याने पारंपरिक मासेमारीवर भर (लहान जाळी आणि बोटी) होता, उत्पादन कमी (१.२ लाख टन) होते. राज्य मत्स्यव्यवसाय विभागाची स्थापना आणि मासेमारी बोटींना अर्थसहाय्य अशी सुरुवात झाली. १९६० च्या दशकात 'महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय कायदा १९६०' लागू झाला, जो मासे संरक्षण आणि संवर्धनाशी निगडीत होता. निवडक जलक्षेत्रात मासे संरक्षणासाठी कलम ९ अंतर्गत नियम लागू केले. यामध्ये निर्धारित जाळीपेक्षा लहान जाळी असलेल्या जाळ्याने मासेमारी करणे, जवळच्या हंगामात प्रतिबंधित प्रजातीच्या कोणत्याही माशांना मारणे, घेणे, विकणे किंवा मारण्याचा, घेण्याचा किंवा विकण्याचा प्रयत्न करणे, निर्धारित उपकरण किंवा पद्धतीव्यतिरिक्त इतर कोणत्याही उपकरण किंवा पद्धतीने मासेमारी करणे किंवा मासेमारी करण्याचा प्रयत्न करणे, या कायद्यांतर्गत बनवलेल्या नियमांनुसार प्रतिबंधित असताना, कोणत्याही वेळी मासे पकडण्याच्या एकापेक्षा जास्त पद्धती वापरणे, निषिद्ध पाण्यात मासेमारी करणे किंवा मासेमारी करण्याचा प्रयत्न करणे आणि देवाणघेवाण करण्यास मनाई आहे असा कोणताही मासा विक्रीसाठी देणे किंवा उघड करणे किंवा देवाणघेवाण करणे असे तीव्र गुन्ह्यांचे वर्णन केले आहे.

अंतर्गत प्रदेशात, 'ग्रामसरोवर विकास कार्यक्रम' अंतर्गत तलाव व जलाशय मत्स्यव्यवसायासाठी विकसित करण्यावर भर देण्यात आला. १९६९ च्या नियमांनी धरण/बंधारा बांधणीवर नियंत्रण आले. उत्पादनात वार्षिक ३.३५% वाढ, पण कोकणात मान्सून प्रभाव, अंतर्गत भागात दुष्काळ ही भौगोलिक आव्हाने कायम. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषि संघटनेच्या FAO १९६५ च्या संशोधनांनुसार, उत्तर कोकणात निमखाऱ्या पाण्यातील मत्स्यपालन सुरू, ज्यात ठाणे जिल्ह्यात खाडीमध्ये झिंगे शेतीचा समावेश. हरित क्रांतीच्या प्रभावाखाली, धरणांच्या जलाशयांमध्ये मासेमारीसाठी अनुकूल क्षेत्र शक्यता ओळखली गेली. मत्स्य उत्पादन वाढवणे हे या काळातील प्रमुख ध्येय होते.

**२. हरितक्रांतीचा प्रभाव आणि सहकार चळवळीचा विस्तार (१९७१-८०):**

या दशकात विकासावर भर देण्यात आला. यांत्रिक बोटी आणि जपान आणि नॉर्वे इ. विदेशी तंत्रज्ञानाची मत्स्य व्यावसाईकांनाओळख झाली. राष्ट्रीय पातळीवर हरितक्रांतीच्या प्रभावाने नील क्रांती सुरू झाली, त्यामुळे

महाराष्ट्रात कोकणात सागरी उत्पादनात वाढ झाली. १९७९-८० मध्ये हँडबुक ऑफ बेसिक इकॉनॉमिकच्या आकडेवारीनुसार, उत्पादन १.५ लाख टन, त्यामध्ये कोकणात ७०% योगदान. परंतू अतिमासेमारीमुळे सागरी जैवविविधतेवर विपरित परिणाम झाला. तथापि, सागरी मासेमारी अजूनही मोठ्या प्रमाणात पारंपारिक पद्धतीने चालत होती. या काळात मत्स्यबंदरांच्या दुरुस्तीवर लक्ष केंद्रित केले गेले.

अंतर्गत प्रदेशात कटला, रोहू, मृगळ इ. संकरित माशांची ओळख करून देण्यात आली व त्यांची लागवड सुरू झाली, ज्यामुळे उत्पादनात लक्षणीय वाढ झाली. मत्स्य सहकारी संस्थांना अधिक चालना मिळाली. अंतर्गत भागात मासेमारीसाठी जलाशय भाडेपट्ट्याने करारावर देण्याचे धोरण, विदर्भात 'मत्स्यपालक विकास संस्था' FFDA अंतर्गत मत्स्यपालन यशस्वी करण्यासाठी तलावात मत्स्यबीज सोडल्याने मासेमारीत वाढ, मराठवाड्यात जायकवाडी धरण जलाशय विकास झाला. मत्स्य शेतकऱ्यांना मार्गदर्शन देण्यासाठी विस्तार सेवा सुरू करण्यात आल्या.

**३. तंत्रज्ञानाचा स्वीकार व मत्स्योद्योगांचा उदय (१९८१-१९९०):**

या दशकात केंद्र शासनाच्या सागरी धोरणांचा प्रभाव महाराष्ट्रावर दिसून आला. 'महाराष्ट्र सागरी मासेमारीचे नियमन कायदा' (MMFRA) १९८१ मध्ये लागू झाला. मासेमारीसाठी मोठ्या बोटी व जाळयांचा वापर सुरु झाला त्यामुळे खोल समुद्रात मासेमारीला चालना मिळाली आणि उत्पादन वाढले, परंतू यास पारंपरिक मच्छीमारांकडून विरोध सुरु झाला. छोट्या मच्छिमारांच्यात मासेमारीसाठी स्पर्धा निर्माण झाली. मत्स्य उत्पादन वाढ (२.५ लाख टन), पण FAO अहवालानुसार जैवविविधता कमी झाली. किनारपट्टीवरील माशांच्या प्रक्रिया आणि शितगृह या मत्स्योद्योगांचा प्रारंभ झाला त्यामुळे निर्यातीकडे प्रारंभिक लक्ष दिले गेले. कोकणात जिल्हा समित्या स्थापन होऊन रायगड आणि रत्नागिरीत मान्सून काळात मासेमारीस बंदी घालण्यात आली. अंतर्गत भागात नियम मजबूत, विदर्भात जलाशय व्यवस्थापन.

अंतर्गत भागात, 'राष्ट्रीय मत्स्यविकास बोर्ड' (NFDB) सारख्या राष्ट्रीय संस्थांच्या मदतीने प्रकल्प राबविले गेले.कृत्रिमरित्या उत्पादन केलेल्या संवर्धित मत्स्य बीजांचा वापर वाढला आणि मत्स्य लागवडीचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविले गेले.

**४. आर्थिक सुधारणा, निर्यात वाढ आणि संघर्षाची लक्षणे (१९९१-२०००):**

१९९१ च्या आर्थिक सुधारणांनंतर, मत्स्यव्यवसायावर जागतिकीकरणाचा प्रभाव पडला. १९९१ च्या नवीन खोल सागरी मासेमारी धोरणात विदेशी जहाजांचा समावेश केला. यास महाराष्ट्रात विरोध झाला पारंपरिक मच्छीमारांनी कोकणात आंदोलने केली. सागरी प्रदेशात निर्यातीस चालना मिळाली. कोळंबी व इतर सागरी उत्पादनाच्या निर्यातीत वाढ झाली. कोकणात उत्पादन ३.६ लाख टन तथापि, याच दशकात अतिमासेमारी, सागरी प्रदूषण आणि मोठ्या आणि लहान बोटी यांच्यातील संघर्ष या समस्याही दिसू लागल्या.

अंतर्गत प्रदेशात, शासनाने जलाशयांमध्ये सामुदायिक मत्स्यव्यवसाय विकसित करण्यावर भर दिला. 'जलाशय मत्स्यव्यवसाय विकास कार्यक्रम' अंतर्गत मोठ्या जलाशयांचा समावेश करण्यात आला. सहकारी संस्थांचे महत्त्व कायम राहिले.

**५ .शाश्वततेकडे वाटचाल आणि संवर्धनाची चळवळ (२००१-२०१०):**

या दशकात मत्स्य साधनसंपत्ती ऱ्हासाची जाणीव वाढली. सागरी प्रदेशात, अतिमासेमारी रोखण्यासाठी बंधने

घालण्याच्या मागण्यांना सुरुवात झाली. 'सागरी मासेमारी धोरण' (२००४) आणि 'सागरी मासेमारी नियमन कायदा' (२००५) यांचा प्रभाव राज्य धोरणावर पडला. माशांच्या संवर्धनासाठी बंदीच्या हंगामाचे काटेकोरपणे पालन करण्यात आले. कोकणात यांत्रिक मासेमारीवर भर, समुद्रकिनारा संवर्धन अंतर्गत खारफुटी (मॅंग्रोव) जंगलांचा विकास कार्यक्रमांना चालना मिळाली. मत्स्यउत्पादन वाढ, २००७-२०११ मध्ये मूल्य १,२५९ ते २,१२२ कोटी असून संकट असूनही, हवामान अनुकूल शाश्वत धोरणे दिसून येतात.

अंतर्गत प्रदेशात, जैविक विविधतेचा ऱ्हास आणि पाण्याच्या स्त्रोतांचे प्रदूषण ही आव्हाने निर्माण झाली. राष्ट्रीय कृषी विकास योजना (NAFED) अंतर्गत मत्स्यव्यवसाय प्रकल्पांना अधिक अनुदान मिळू लागले. तलावांच्या पुनर्भरणावर भर देण्यात आला.

**६.नील क्रांतीचा उदय आणि एकात्मिक धोरणे (२०११-२०२०):**

या दशकात मत्स्यव्यवसायास 'कृषी'चा दर्जा मिळाला, ज्यामुळे विमा आणि इतर अनुदान उपलब्ध झाले. केंद्र शासनाच्या 'नील क्रांती' योजनेचा (२०१५) फायदा राज्याला मिळाला. सागरी प्रदेशात, बोटींची सुरक्षा (जीपीएस व्यवस्था), प्रक्रिया एककांचे आधुनिकीकरण, जैवविविधता व्यवस्थापन आणि मूल्यवर्धित उत्पादनांवर भर देण्यात आला. मत्स्य पर्यटन ही नवीन संकल्पना दक्षिण कोकणात रुजू लागली.

अंतर्गत प्रदेशात, 'प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना' (PMMSY) अंतर्गत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाली. एकात्मिक व पिंजरा पद्धतीची मत्स्यशेती, आणि जैविक मत्स्यव्यवसाय यांना प्रोत्साहन देण्यात आले. महिला मत्स्य उद्योजकतेवर लक्ष केंद्रित करण्यात आले. २०१९ मध्ये, राज्य शासनाने 'महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय धोरण २०२१' सादर करण्याची प्रक्रिया सुरू केली.

**७. विशेष आर्थिक क्षेत्र धोरण, हवामान बदल आणि निळी अर्थव्यवस्था (२०२०-२०२५):**

हा कालावधी 'महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय धोरण २०२१' च्या अनुषंगाने सुरू झाला. शाश्वतता, सामाजिक न्याय, तंत्रज्ञानाचा वापर आणि आर्थिक सक्षमीकरण ही या धोरणाची मुख्य तत्त्वे आहेत. सागरी प्रदेशाच्या विकासासाठी, अतिमासेमारी रोखणे, टिकाऊ साधनांचा वापर, मत्स्य विशेष क्षेत्र विकसित करणे, मच्छिमारांच्यासाठी कल्याणकारी योजना, आणि कोविड-१९ नंतरच्या काळातील नुतनीकरण अशी विशिष्ट उद्दिष्टे आहेत. निळी अर्थव्यवस्था या संकल्पनेला चालना देऊन PMMSY अंतर्गत ४,०६१ कोटी गुंतवणूक केली आहे.

भारताच्या सागरी विशेष आर्थिक क्षेत्रात मासेमारी करण्यासाठी केंद्र सरकारच्या मत्स्यपालन, पशुपालन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाने नवीन अधिसूचना दि. ४ नोव्हेंबर, २०२५ रोजी जारी केली आहे. नव्या नियमांनुसार भारताच्या विशेष आर्थिक क्षेत्रात मासेमारी करण्यासाठी आता प्रवेश पास अनिर्वाय असणार आहे. २४ मीटरपेक्षा कमी लहान नौकांना पास आवश्यक नाही, मात्र जर या नौका कुपा (ट्यूना) आणि तत्सम प्रजातींसाठी मासेमारी करत असतील तर पास घ्यावा लागेल.

भारताच्या विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये भारतीय नौकांनी पकडलेले मासे भारतीय मूळाचे मानले जातील. ते भारतातील बंदरावर उतरविल्यास कोणतेही आयात शुल्क लागू होणार नाही. जर ते परदेशी बंदरावर उतरविले, तर ती निर्यात मानली जाईल. जर नौका परदेशी प्राधिकरणाकडून जप्त झाली तर राज्य मत्स्यपालन विभाग व केंद्र सरकारला तत्काळ कळविणे गरजेचे आहे. नौकांना व्यापारी जहाज कायदा, १९५८ नुसार सर्व सुरक्षा नियमांचे पालन करावे

लागेल. सर्व मच्छीमारांना क्यू आर कोडयुक्त आधार कार्ड किंवा 'सागरी मच्छीमार डिजिटल ओळखपत्र' बाळगणे बंधनकारक करण्यात आले आहे.

डायनामाइट, विषारी रसायने किंवा स्फोटकांचा वापर, दोन बोटींनी मिळून एक मोठी जाळी खेचून मासेमारी आणि प्रकाशयंत्रांचा वापर करून मासेमारी करने किंवा गिल जाळ्याने लहान मासे पकडणे, प्रतिबंधित क्षेत्रामध्ये किंवा बंदीच्या हंगामात मासेमारी करणे ही प्रतिबंधित कामे म्हणून घोषित केली आहेत.

केंद्र सरकार वैज्ञानिक संस्था, किनारी राज्ये आणि मच्छीमार संघटनांशी वैज्ञानिक दृष्टिने सल्लामसलत करून व्यवस्थापनासाठी योजना तयार करून मच्छीमारांना पूरक उत्पन्नाच्या संधी निर्माण केल्या जाणार आहेत.

अंतर्गत प्रदेशात जलाशयांची उत्पादकता वाढवणे, नवीन प्रजातींचे संशोधन, डिजिटल तंत्रज्ञानाचा बाजारपेठेत (ई-विपणन) वापर, आणि हवामान बदलाशी जुळवून घेणे इ. बाबत धोरणे दिसून येतात. दोन्ही प्रदेशांसाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा सॉफ्टवेअर, मोबाईल ॲप्स वापर वाढवण्यावर भर दिला जात आहे.

**मत्स्यव्यवसाय भविष्यातील दिशा:**

सागरी क्षेत्रात एकात्मिक किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन, मत्स्य संवर्धन विस्तार, मत्स्य विशेष आर्थिक क्षेत्रात मूल्यवर्धन शृंखला वाढविणे, खोल सागरातील संशोधनावर भर आणि मच्छिमारांचा बहुआयामी विकास करणे इ. बाबींचा विचार करावा लागेल.अंतर्गत प्रदेशात जलसंवर्धनाशी मत्स्यव्यवसायाचे अधिक एकत्रीकरण, हवामान सुसह्य प्रजातींचा विकास, सेंद्रिय मत्स्यव्यवसायाला प्राधान्य, आणि सहकारी संस्थांद्वारे डिजिटल तंत्रज्ञान (AI, GIS) विपणन व्यवस्था बळकट करणे गरजेचे आहे.थोडक्यात, जैविक सुरक्षा, रोग नियंत्रण, बीज कार्यक्षमता, विमा सुविधांचा विस्तार आणि मत्स्यव्यवसायाशी संलग्न तरुण पिढीला आकर्षित करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष:**

१९६० ते २०२५ या सहा दशकांत महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसाय धोरणांनी उत्पादन आणि रोजगार वाढविले, परंतू भौगोलिक असमानता आणि आव्हाने कायम आहेत. सागरी प्रदेशाच्या धोरणात तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण आणि निर्यातीचा प्रभाव जास्त दिसून येतो.

अंतर्गत प्रदेशाचे धोरण सहकार, सामुदायिक व्यवस्थापन आणि ग्रामीण लोकांच्या कल्याणाशी अधिक निगडित राहिले आहे. भौगोलिक विषमता कमी करणे, दोन्ही प्रदेशांत शाश्वत पद्धतींचा वापर करणे आणि मत्स्यव्यवसाय समुदायाचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय धोरण, २०२१ हा या आव्हानांना सामोरे जाण्याचा एक सूत्रबद्ध प्रयत्न आहे. भविष्यातील विकासासाठी, भौगोलिक संदर्भाला अनुरूप अशी लवचिक धोरणे, सतत संशोधन आणि सर्वांचा सक्रिय सहभाग महत्वपूर्ण आहे.

**उपाययोजना:**

१. सागरी क्षेत्रात अति मासेमारी नियंत्रणासाठी शास्त्रीय दृष्टीने मासेमारीवर निर्बंध लागू करून त्यांची अंमलबजावणी करणे.
२. छोट्या मच्छिमारांच्या राखीव क्षेत्रांची व्यवस्था बळकट करणे.
३. मत्स्यबंदरे आणि केंद्रांचा दर्जा व सुविधा सुधारणे.
४. मच्छिमार समुदायांसाठी पर्यटन, खारफुटी संवर्धन असे पर्यायी रोजगार विकसित करणे.

५. सागरी प्रदूषण कमी करण्यासाठी कार्ययोजना राबविणे.

६. अंतर्गत प्रदेशात सर्व जलाशयांचे मत्स्यव्यवसायासाठी शास्त्रीय सर्वेक्षण करून त्यांची उत्पादक क्षमता वाढविणे.

७. मत्स्य सहकारी संस्थांची कार्यक्षमता व पारदर्शकता वाढविणे.

८. मत्स्यबीजासाठी स्थानिक स्त्रोत वापरण्याचे प्रशिक्षण देणे.

९. हवामान बदलाचा सामना करण्यासाठी सुसह्य प्रजातींच्या संशोधनाला प्राधान्य देणे.

१०. ई-विपणन (e-NAM) व्यवस्थेशी मत्स्य उत्पादकांची जोडणी करणे. दलालांचे प्रमाण कमी करून उत्पादकांना चांगला भाव मिळेल याची खात्री करणे.

११. मत्स्यव्यवसाय विभागाची तांत्रिक क्षमता वाढविणे, तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करणे.

१२. महिलामत्स्य स्वयंसहाय्य गटांना प्रोत्साहन देणे.

१३. सहकारी मत्स्य विशेष आर्थिक क्षेत्रांचा विकास करणे.

१४. सतत शाश्वतता परीक्षण करणे.

**संदर्भः**


१. महाराष्ट्र शासन, मत्स्यव्यवसाय विभाग.

२. महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय कायदा, १९६०.

३. महाराष्ट्र सागरी मासेमारीचे नियमन कायदा (MMFRA), १९८१.

४. भारत सरकार, सागरी मासेमारी धोरण (२००४)

५. भारत सरकार, सागरी मासेमारी नियमन कायदा (२००५)

६. भारत सरकार, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय मंत्रालय, नील क्रांती योजना (२०१५)

७. भारत सरकार, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय मंत्रालय, प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना,२०२० (PMMSY).

८. महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय धोरण, २०२१.

९. महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण.

१०. पंचवार्षिक योजना (भारत सरकार व महाराष्ट्र शासन).

११. Handbook of Basic Economic 1979-80.

१२. Ministry of Fisheries, Maharashtra - Wikipedia.

१३. https://nfdb.gov.in

१४. https://afbnglobal.com

१५. https://www.fao.org